# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक-16.05.2026** **वार- शनिवार**

---

**जनगणना**

जनगणना २०२७ अंतर्गत महाराष्ट्रासह राज्यं आणि दिल्ली महानगरपालिका क्षेत्रात स्वगणनेचा कालावधी काल संपला आणि आजपासून घरयादी आणि गृहगणनेचा दुसरा टप्पा सुरू होत आहे. या टप्प्यांतर्गत, १६ मे ते १४ जून या कालावधीत प्रगणक माहिती संकलित करण्यासाठी किंवा नोंदवून घेण्यासाठी घरोघरी भेट देतील. सरकारनं अधिसूचित केलेल्या ३३ प्रश्नांची माहिती मोबाइल ॲप्लिकेशनद्वारे संकलित केली जाईल. ज्यांनी स्वगणना प्रक्रिया पूर्ण केली आहे, त्यांच्या एसई आयडीद्वारे त्यांनी भरलेल्या माहितीची पडताळणी प्रगणक करतील.जनगणनेद्वारे घेण्यात येणारी सर्व माहिती पूर्णतः गोपनीय राहणार असून जनगणनेच्या अधिनियमानुसार नागरिकांनी प्रगणकांना माहिती देणे अपेक्षित आहे.

**उद्घाटन**

पुण्यातील बाणेर येथे महापालिकेच्या सहकार्याने 'पीपीपी' तत्त्वावर आपुलकी मेडिकल केअर सेंटरतर्फे अत्याधुनिक कर्करोग रुग्णालय उभारण्यात आलं आहे. १५० खाटांची क्षमता असलेल्या या रुग्णालयात शासकीय दरात उपचार उपलब्ध होणार आहेत.एकंदर १६५ कोटी रुपयांचा हा प्रकल्प असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या याचं लोकार्पण होणार आहे.

**नावबदल**

पुणे महापालिकेच्या मालमत्तांना नाव देण्याच्या प्रक्रियेत बदल करण्यात आला आहे. नव्या नियमानुसार रस्ते, चौक आणि उड्डाणपुलांच्या नामकरणासाठी संबंधित प्रभागातील सर्व चार नगरसेवकांची संमती आवश्यक राहणार नसून, चारपैकी तीन नगरसेवकांच्या स्वाक्षऱ्या असल्यास नामकरणाचा प्रस्ताव मंजूर करता येणार आहे. या निर्णयामुळे चार सदस्यीय प्रभागात एखाद्या नावाला एका नगरसेवकाचा विरोध असला, तरी उर्वरित तीन सदस्यांच्या संमतीवर सत्ताधारी पक्षाला आपल्या पसंतीचे नाव देणे शक्य होणार आहे.

**नो व्हेईकल डे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलेल्या काटकसरीच्या आवाहनाला प्रतिसाद देत पिंपरी-चिंचवड महापालिकेत दर गुरुवारी 'नो व्हेईकल डे' पाळण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. याबाबतची घोषणा महापौर रवी लांडगे यांनी सर्वसाधारण सभेत केली. महापालिकेच्या विविध कामांसाठी अधिकारी आणि पदाधिकारी महापालिकेची किंवा खासगी वाहने वापरतात. काही वाहने भाडेतत्त्वावरही घेण्यात आली आहेत. मात्र 'नो व्हेईकल डे'च्या दिवशी अधिकारी आणि पदाधिकाऱ्यांनी पीएमपी, मेट्रो यांसारख्या सार्वजनिक वाहतूक सेवांचा वापर करावा, असे आवाहन महापौर लांडगे यांनी केलं आहे.

**लोदि**

पुणे शहर तहसील कार्यालयात १८ मे रोजी लोकशाही दिनाचं आयोजन करण्यात आलं आहे. लोकशाही दिनामध्ये नागरिकांनी त्यांच्या समस्या आणि मागण्यांसंदर्भातील अर्ज लेखी स्वरूपात सादर करण्याचं आवाहन पुणे शहरच्या तहसीलदार स्मिता माने यांनी केलं आहे.

**प्रकाशदिन**

आज 'आंतरराष्ट्रीय प्रकाश दिन' साजरा होत आहे. 'शाश्वत भविष्यासाठी प्रकाश' ही यंदाची या दिनाची संकल्पना आहे. भौतिकशास्त्रज्ञ थिओडोर मेमन यांनी १९६० मध्ये लेझरचा पहिला प्रयोग केला, त्यांच्या स्मरणार्थ दरवर्षी १६ मे हा दिवस 'आंतरराष्ट्रीय प्रकाश दिन' म्हणून साजरा केला जातो. प्रकाशाच्या अभ्यासानं पर्यायी ऊर्जा स्रोत, जीवनरक्षक वैद्यकीय साधनं, उपचार, तंत्रज्ञान आदी क्षेत्रांमध्ये प्रगती साधली आहे. त्या पार्श्वभूमीवर युनेस्कोनं वैज्ञानिक सहकार्य अधिक दृढ करण्याचं, तसंच शांतता आणि शाश्वत विकासासाठी प्रकाशाच्या शक्तीचा अधिकाधिक उपयोग करण्याचं आवाहन केलं आहे.

**मराठीफिल्मफे**

यंदा पुण्यात २२ ते २४ मे २०२६ दरम्यान सहावा मराठी चित्रपट महोत्सव रंगणार आहे. शिवाजीनगर इथल्या ई-स्क्वेअर चित्रपटगृहात याचं आयोजित करण्यात आलं असून, प्रेक्षकांसाठी तो विनामूल्य खुला असणार आहे. एका खाजगी मनोरंजन रेडिओ वाहिनीच्या माध्यमातून याचं आयोजन करण्यात आलं आहे. यंदाच्या महोत्सवात समकालीन चित्रपटांसोबतच काही अजरामर क्लासिक चित्रपटांचे विशेष प्रदर्शन आयोजित करण्यात आले आहे. याशिवाय दिग्दर्शक आणि कलाकारांशी संवाद तसेच विशेष चर्चासत्रेही आयोजित करण्यात येणार आहेत.

**निवड**

गायन, वादन आणि नृत्य या कला प्रकारात पूर्णवेळ शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी पुण्यातील गांधर्व महाविद्यालयामार्फत गुरुकुल निवासासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची निवड चाचणी ८ जून २०२६ रोजी महाविद्यालयात होणार असून, निवड झालेल्या विद्यार्थ्यांना १२ जून २०२६ पासून निवासाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. यासाठीचे अर्ज गांधर्व महाविद्यालयात सोमवार ते शनिवार सकाळी १० ते सायंकाळी ५ या वेळेत उपलब्ध असतील. अधिक माहितीसाठी ७२-७६-१८-१२-७६ या क्रमांकावर संपर्क साधण्याचं आवाहन उपप्राचार्या परिणिता मराठे यांनी केलं आहे.

**पाऊस**

भारतीय हवामान विभागाने दिलेल्या माहितीनुसार, नैऋत्य मान्सूनने भारतात अधिकृतरीत्या प्रवेश केला असून तो अंदमान आणि निकोबार बेटांवर दाखल झाला आहे. मान्सूनने अंदमान समुद्रासह बंगालच्या उपसागराचा काही भाग व्यापला असून अंदमान बेटांमध्ये जोरदार पावसाची नोंद करण्यात आली आहे. यंदा नैऋत्य मान्सून केरळात नेहमीपेक्षा लवकर दाखल होण्याची शक्यता आहे. साधारणपणे १ जूनच्या सुमारास केरळ किनारपट्टीवर पोहोचणारा मान्सून यंदा २६ मे रोजी केरळात धडक देऊ शकतो, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने वर्तवला आहे. बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र अधिक सक्रिय झाल्याने मान्सूनच्या वेगात वाढ झाली आहे

**हवामान**

पुणे आणी परिसरात आज कमाल तापमान 40 तर किमान तापमान २३ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही याचप्रमाणे तापमान राहण्याची तसच आकाश दुपारी निरभ्र राहून संध्याकाळी आकाश अंशतः ढगाळ राहण्याची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत ; उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**